




दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com



1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





• वर्ष : ०३ • अंक : १८६ • पुणे • बुधवार, दि. २५ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313


## ठळक बातम्या

### कोथरूड-कर्वेनगर : सांस्कृतिक बेट

पुणे (आरंभ पर्व) : एके काळी शहराच्या मध्य भागात होणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे शहराच्या विस्ताराबरोबर स्थलांतर होत आहे. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कर्वेनगर परिसरातील पंडित फार्म्स, महालक्ष्मी लॉन्स आणि वारजे भागातील काकडे फार्म्स येथे गेल्या काही वर्षांत सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये वाढ झाली असून, कोथरूड-कर्वेनगर आता पुण्यातील सांस्कृतिक कार्यक्रमांचे बेट होत आहे. मध्यवर्ती भागांतील पेठांपुरत्या मर्यादित असलेल्या पुण्याचा १९६१ मध्ये आलेल्या पानशेत पुरानंतर चेहरामोहरा बदलला. छत्रपती संभाजी महाराज पुलापलीकडे कोथरूड-कर्वेनगर आणि पर्वतीच्या पलीकडे सहकारनगर, बिबवेवाडी, धनकवडी, कात्रज अशा भागांमध्ये नागरी वसाहती वाढू लागल्या. कोथरूडचा तर इतक्या झपाट्याने विकास झाला, की सर्वाधिक वेगाने विकसित झालेले उपनगर म्हणून गिनीज बुकमध्ये त्याची नोंद घेण्यात आली.

### खंडणीसाठी व्यापाऱ्याचे अपहरण

पुणे (आरंभ पर्व) : दीड कोटीच्या खंडणीसाठी गुलटेकडी परिसरातून एका व्यापाऱ्याचे अपहरण करण्यात आल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत एका व्यापाऱ्याच्या पत्नीने स्वारगेट पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अल्पवयीन युवतींवर बलात्कार

पुणे (आरंभ पर्व) : चंदननगर परिसरात अल्पवयीन युवतींना धमकावून त्यांच्या बलात्कार करण्यात आल्याच्या दोन घटना घडल्या. या प्रकरणात पोलिसांनी दोन तरुणांना अटक केली आहे. याबाबत एका अल्पवयीन युवतीच्या आईने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# रोहित पवारांच्या संघर्षाला यश!

## अजित दादांच्या मृत्यूप्रकरणी "झिरो FIR" दाखल; ६६ पानांच्या पुराव्यांनी हलवलं सरकार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अजित पवार यांच्या कथित विमान अपघात प्रकरणाला आता नवे वळण मिळाले असून, आमदार रोहित पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर अखेर या प्रकरणात पहिला गुन्हा नोंदवण्यात आला आहे. महाराष्ट्रात गुन्हा नोंदवला जात नसल्याचा आरोप करत रोहित पवार यांनी थेट कर्नाटक गाठले आणि तेथे तक्रार दाखल केली होती.

बेंगळुरू येथील हाय ग्राऊंड पोलीस ठाण्यात सोमवारी झिरो एफआयआर नोंदवण्यात आला. भारतीय न्याय संहितेतील विविध कलमांखाली हा गुन्हा दाखल करण्यात आला असून, रोहित पवार यांनी दिलेल्या सविस्तर फिर्यादीच्या आधारे कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, या झिरो एफआयआरमध्ये कोणत्याही एका व्यक्तीचे नाव आरोपी म्हणून नमूद करण्यात आलेले नाही, तर "सर्व संबंधित व्यक्ती" असा उल्लेख करण्यात आला आहे. या प्रकरणात रोहित पवार यांनी 66 पानांची कागदपत्रे कर्नाटक पोलिसांकडे सादर केली आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, महाराष्ट्रात मरीन ड्राईव्ह आणि बारामती पोलीस ठाण्यात वारंवार मागणी करूनही गुन्हा दाखल करण्यात आला नाही. त्यामुळे न्याय मिळवण्यासाठी कर्नाटकात जावे लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाचा मुख्य मुद्दा म्हणजे तपासाची दिशा. सध्या सीआयडीकडून या घटनेचा तपास अपघाती मृत्यू म्हणून केला जात असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीत हा केवळ अपघात नसून "गुन्हेगारी षडयंत्र" असू शकतो, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा स्वतंत्र आणि सखोल गुन्हेगारी तपास व्हावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

कर्नाटक पोलिसांनी नोंदवलेला हा झिरो एफआयआर आता महाराष्ट्र पोलीस महासंचालकांकडे पाठवण्यात आला आहे. पुढील प्रक्रिया म्हणून महाराष्ट्रात गुन्हा नोंदवला जाऊन तपास सुरू होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या प्रकरणामुळे राजकीय वातावरणही तापण्याची चिन्हे आहेत. एका बाजूला न्यायासाठी लढा देत असल्याचा दावा, तर दुसऱ्या बाजूला तपास प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत असल्याने, पुढील काही दिवसांत या प्रकरणात महत्त्वाच्या घडामोडी घडण्याची शक्यता आहे.

## कालवाफुटीच्या पार्श्वभूमीवर खडकवासला-फुरसुंगी बोगदा योजनेला गती



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला धरण ते फुरसुंगीपर्यंत शहरातून वाहणारा मुठा उजवा कालवा बंद करून त्याऐवजी भूमिगत बोगदा तयार करण्याच्या कामाने वेग घेतला आहे. या कामांतर्गत खडकवासला, धायरी, वडाचीवाडी आणि उरुळी देवाची या चार ठिकाणी मिळून दोन किलोमीटर लांबीच्या बोगद्याचे काम पूर्ण झाले असून, २०२९ पर्यंत संपूर्ण काम करण्याचे नियोजन जलसंपदा विभागाकडून करण्यात आले आहे. खडकवासला धरणापासून ते फुरसुंगीपर्यंत भूमिगत जलवाहिनी टाकण्यासाठी २८ किलोमीटर बोगद्यास केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. खडकवासला ते फुरसुंगी दरम्यानच्या मुख्य बोगद्यापर्यंत पोहोचण्यासाठी ॲप्रोच बोगदा तयार करावा लागणार आहे. त्यासाठी शहरात चार ठिकाणी कामे सुरू करण्यात आली आहे. त्यात वडाचीवाडी, उरुळी देवाची या दोन ठिकाणी काम सुरू करण्यात आले आहे. वडाचीवाडी येथे ९५० पैकी ४०० मीटरचा, तर उरुळी देवाची येथे ८५०पैकी ३०० मीटर असे सुमारे सातशे मीटरच्या बोगद्याच्या खोदाईचे काम पूर्ण झाले आहे. खडकवासला आणि धायरी येथील बोगद्याचे कामही पूर्ण झाल्याची माहिती जलसंपदा विभागातील अधिकाऱ्यांकडून देण्यात आली. मेघा इंजिनिअरिंग या कंपनीमार्फत या बोगद्याचे काम सध्या सुरू आहे. कामासाठी कंपनीने हैदराबादहून कर्मचारी, अभियंत्यांची कुमक दिली असून, बोगदा तयार करण्यासाठी ड्रिल आणि ब्लास्टिंग पद्धतीचा वापर केला जात आहे. कंपनीने आरएमसी प्लाण्ट, क्रशर, पोकलेन, .ट्रीपर, गुणनियंत्रण प्रयोगशाळा उपलब्ध केली आहे. तसेच 'क्वालिटी कंट्रोल विंग' सुरू केला आहे. मुख्य बोगद्यापर्यंत जाण्यासाठीच्या बोगदा तयार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे.

## नवले पुलावरील अपघातांवर कायमस्वरूपी तोडगा

### ६ हजार कोटींचा एलिव्हेटेड रोड प्रस्ताव केंद्राकडे



**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

पुण्यातील नवले पुल परिसरात वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून सुमारे ६ हजार कोटी रुपयांचा एलिव्हेटेड रोड प्रकल्प केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली. या संदर्भात सदस्य भीमराव तापकीर यांनी प्रश्न उपस्थित केला होता. कदम यांनी सांगितले की, संबंधित राष्ट्रीय महामार्गाचा सुमारे ५ ते ६ किलोमीटरचा भाग तांत्रिकदृष्ट्या संवेदनशील आहे. या भागात रस्त्याचा उतार आणि ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्या जड वाहनांमुळे वाहतूक कोंडी निर्माण होते, परिणामी अपघातांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे या ठिकाणी कायमस्वरूपी तोडगा म्हणून एलिव्हेटेड रोड उभारणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मागील चार वर्षांत नवले पुल परिसरात अपघातांची संख्या चढ-उताराची राहिली आहे. जखमींना आवश्यक ती आर्थिक मदत व उपचार देण्यात आले असल्याचेही मंत्री कदम यांनी सांगितले. नवले पूल परिसराला 'ब्लॅक स्पॉट' म्हणून घोषित करण्यात आले आहे. अपघात कमी करण्यासाठी काही तात्पुरत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये रस्त्याची रुंदी ७ मीटरवरून १०.५ मीटरपर्यंत वाढविणे, वेगमर्यादा ६० किमीवरून ४० किमी प्रति तास करणे, वाहतूक पोलीस बंदोबस्त वाढविणे, स्वयंसेवकांची नियुक्ती आणि जड वाहनांसाठी सकाळी ६ ते संध्याकाळी ६ या वेळेत निर्बंध लावणे यांचा समावेश आहे. या सर्व उपाययोजनांनंतरही अपघात पूर्णपणे थांबत नसल्याने दीर्घकालीन उपाय म्हणून एलिव्हेटेड रोड प्रकल्प प्रस्तावित करण्यात आला आहे.

### राज्यात कॅबिनेट मंत्र्यांना मार खावा लागतोय, पोलिसांमागे 'अदृश्य शक्ती'चा हात - सुप्रिया सुळे

## पांडुरंगा हे काय दिवस दाखवतोयस?



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शंभुराज देसाई यांना झालेल्या धक्काबुक्की प्रकरणाचा आणि पोलिसांचा काहीही संबंध नाही.पोलिसांच्या मागे जी अदृश्य शक्ती होती त्यांची ही ताकद आहे. त्या शक्तीने पोलिसांना हे करायला लावले, पोलिस स्वत:हून असे काही करणार नाही मला विश्वास आहे असे शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटले आहे.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मी मुख्यमंत्र्यांना या विषयी पत्र लिहणार आहे. कालही मी भाजपच्या अनेक वरीष्ठ लोकांशी चर्चा केली आहे. ही लोकशाहीची हत्या आहे, ही गोष्ट अत्यंत अस्वस्थ करणारी आहे. या पक्षामध्ये याबद्दल काय चर्चा झाली हे मला माहिती नाही. पण हा काही मोठा-छोटा भाऊ असा विषय नाही. हा लोकशाहीचा विषय आहे. लोकशाहीत अशी गुंडगिरी होणार असेल तर त्याविरोधात ताकदीने लढण्याची गरज आहे. आज साताऱ्यात झाले उद्या 10 ठिकाणी होईल. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, साताऱ्यात जी घटना झाली त्याचा मी जाहीर निषेध करते. मला धक्का बसला हा यशवंतराव चव्हाण यांचा महाराष्ट्र आहे. चव्हाणांनी मंगल कलश आणला तो काय हा दिवस पाहण्यासाठी का? असा सवाल सुप्रिया सुळेंनी केला आहे. माझा विश्वासच बसू शकत नाही की कॅबिनेट मंत्र्यांना मतदान करण्यासाठी धक्काबुक्की होऊ शकते.

सुप्रिया सुळे म्हणाल्या की, शंभुराज देसाई यांच्या हाताला दुखापत झाली आहे. मी काल मकरंद आबा यांना फोन करत हे काय सुरू आहे, कसे सहन करायचे असे म्हटले आहे. काल विधिमंडळाच्या पायऱ्यावर अजित पवार गटातील मकरंद आबा आणि शिवसेनेचे सर्व आमदार उभे होते.ते सर्व लढायचा प्रयत्न करत होते. हे सर्व दुर्दैवी आणि सशक्त लोकशाहीसाठी दुर्दैवी आहे.या विरोधात लढाई झालीच पाहिजे. हा देश कुणाच्या मर्जीने चालणार नाही. केवळ डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानानेच देश चालणार. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, मकरंद पाटील, शंभुराज देसाई यांना धक्काबुक्की झाली असेल त्यांना न्याय मिळत नसेल तर ही निवडणूक रद्द झाली पाहिजे. या प्रकरणी चौकशी झाली पाहिजे. सरकारमध्ये तुम्ही आहात तेच सरकार तुम्हाला धक्काबुक्की करत आहे, पांडुरंगा हे काय दिवस बघावे लागत आहेत. ते ही मित्र पक्षाच्या नेत्यांना. तुम्ही सत्तेत एकत्र आहात आणि धाकटा भाऊ म्हणणाऱ्याला धक्काबुक्की होत असेल तर राज्याचे राजकारण कुठल्या दिशेने सुरू आहे. तुम्ही शिवराय, शाहु-फुले-आंबेडकर यांचे नाव घेत राजकारण करता मग मार का खाता? असा सवाल सुळेंनी केला आहे.

> **भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राजकीय मतभेद बाजूला सारून घेतलेल्या ठाम भूमिकेचे राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया सुळे यांनी जाहीर स्वागत केले आहे. खरात सारख्या विकृत प्रवृत्तीच्या व्यक्तीला मुख्यमंत्री कधीही पाठीशी घालणार नाहीत, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ज्या भूमिकेसाठी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना आपले प्राण गमवावे लागले, तोच अंधश्रद्धा निर्मूलनाचा वारसा आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे नेत आहेत.**

# चाकणकरांचे महिला प्रदेशाध्यक्षापद जाणार?

### सुनेत्रा पवारांनी घेतली देवेंद्र फडणवीस यांची भेट : भोंदू अशोक खरात प्रकरण भोवणार



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भोंदू अशोक खरात प्रकरणात राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा पाय आणखी खोलात जाण्याची शक्यता आहे. सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यांनी आपल्या पक्षाच्या आमदारांची बैठकही बोलावली आहे. त्यामुळे चाकणकर यांची राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदावरून उचलबांगडी होण्याची शक्यता वाढली आहे.

रुपाली चाकणकर ह्या भोंदू अशोक खरात प्रकरणात अडचणीत सापडल्या आहेत. महिलांचे लैंगिक शोषण करणाऱ्या खरातशी जवळचे संबंध असल्यामुळे चाकणकरांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्यानंतर आता त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस महिला आघाडीचे प्रदेशाध्यक्षपदही जाण्याची शक्यता आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज विधिमंडळात अशोक खरात प्रकरणावर निवेदन करणार आहेत. तत्पूर्वी, सुनेत्रा पवार यांनी त्यांची भेट घेतली. या भेटीचे कारण व तपशील अद्याप बाहेर आला नाही. पण या बैठकीत अशोक खरात प्रकरणावर चर्चा झाल्याचा दावा केला जात आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे रुपाली चाकणकर यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर सुनेत्रा पवारांनी देवगिरी बंगल्यावर प्रफुल्ल पटेल व सुनील तटकरे यांची बैठक घेतली होती. या बैठकीत रुपाली चाकणकर यांच्यामुळे पक्षाच्या होणाऱ्या बदनामीवर चर्चा झाली होती. या बैठकीनंतर पक्षश्रेष्ठींनी चाकणकरांना राष्ट्रवादीच्या महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देण्याची सूचना देण्यात आल्याची माहिती आहे. विशेष म्हणजे सुनील तटकरे यांनी या बैठकीनंतर लगेचच या प्रकरणी कुणालाही पाठिशी घातले जाणार नसल्याचे सूचक विधान केले होते. तेव्हापासूनच चाकणकरांची महिला प्रदेशाध्यक्षपदावरून उचलबांगडी केली जाईल अशी चर्चा रंगली होती.

दुसरीकडे, सुनेत्रा पवारांनी आज सायंकाळी देवगिरी बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सर्व आमदारांची बैठक बोलावली आहे. या बैठकीतही या प्रकरणी धीरगंभीर चर्चा होण्याची शक्यता आहे. विशेषतः रुपाली चाकणकर यांनी महिला प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद कुणाकडे सोपवायचे? याविषयी सुनेत्रा पवार आपल्या सहकारी आमदारांचे मत जाणून घेतील. यावेळी त्या आमदारांना काही महत्त्वाच्या सूचना करणार असल्याचीही माहिती आहे. ज्यांनी हा आयुष्याचा प्रवास जवळून पाहिला, ते सर्व संपर्क करून आम्ही सोबत आहोत हे आवर्जून सांगतात. त्या सर्वांचे आभार. खरात प्रकरणात मी पहिल्या दिवशीच भूमिका स्पष्ट केली आहे. तपास निष्पक्षपणे व्हावा यासाठी आयोगाच्या अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला व त्यानंतरही माझ्यावर केलेल्या आरोपांचे पुराव्यासह स्पष्टीकरण दिले आहे. सत्य समोर येईलच. धायरीकर तुमचे मनापासून धन्यवाद, असे त्यांनी म्हटले आहे.

> ### चाकणकरांनी फेटाळले जादूटोण्याचे आरोप
> **रुपाली चाकणकर यांनी आज एका पोस्टद्वारे त्यांच्यावर जादूटोण्यासाठी अनामिक कापल्याचे होणारे आरोप फेटाळून लावले आहेत. या प्रकरणी त्यांनी धायरीच्या एका गणेश मंडळाच्या अध्यक्षाचा व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओत सदर अध्यक्ष चाकणकरांच्या अनामिकेला गाडीतून उतरताना दुखापत झाल्याचा दावा करताना दिसून येत आहे. चाकणकर याविषयी म्हणाल्या, गेली 20-22 वर्ष सामाजिक, राजकीय क्षेत्रात काम करताना, जसजसा प्रगतीचा आलेख वाढत गेला तसतशी चिखलफेक करणारी विकृती वाढत गेली. प्रत्येक वेळी संयमाने शांतपणाने टिका सहन केली. वैयक्तिक टिका करणे हे माझ्या रक्तातच नाही. पण आता सगळ्या मर्यादा ओलांडून माझ्यासह कुटुंबाला जो त्रास दिला जातोय ते भयावह आहे.**

## भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा?

### शिंदे, चाकणकर, केसरकरांनी घेतली काळजी



• शासन, प्रशासन रसातळाला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

अनेक महिलांचे लैंगिक शोषण करणारा भोंदू अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय? अशी परिस्थिती असल्याची मिश्किल टिप्पणी माहिती अधिकार कार्यकर्ते विजय कुंभार यांनी केली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, रुपाली चाकणकर, दीपक केसरकर आदी नेत्यांनी पदावर असताना अशोक खरातची विशेष काळजी घेतली. त्याचे गुण माहिती असूनही त्याचे उदात्तीकरण केले. त्यामुळे भोंदू खरात हा सरकार पुरस्कृत बाबाच वाटतो, असे ते म्हणालेत. भोंदू अशोक खरातला पोलिसांनी लैंगिक शोषणाच्या आरोपाखाली अटक केली आहे. त्याच्यावर अनेक महिलांचे श्रद्धेच्या नावाखाली लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. राज्यातील अनेक बडे नेते व प्रशासकीय अधिकारी त्याच्या संपर्कात होते. आता प्रहार संघटनेचे नेते बच्चू कडू यांच्यासोबतचा खरातचा एक व्हिडिओही व्हायरल झाला आहे. त्यातच अशोक खरातने एका महिला नेत्याला लोकसभा निवडणुकीचा निकाल धक्कादायकपणे फिरवण्याची ग्वाही दिल्याचीही बाब समोर आली आहे. या पार्श्वभूमीवर विजय कुंभार यांनी या प्रकरणी उपरोक्त टिप्पणी केली आहे. विजय कुंभार एका पोस्टमध्ये म्हणाले, भोंदूबाबा अशोक खरात हा सरकार पुरस्कृत बाबा होता की काय याची खात्री पटावी अशी परिस्थिती सध्या आहे. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे खरातने मंदिरासाठी रस्त्याची मागणी केली आणि ती पूर्ण देखील झाली.मंत्रिमंडळ उप समितीने पाणी दिले, महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी पदावर असताना आणि त्याचे "गुण" माहीत असूनही त्याचे उदात्तीकरण केलं, त्याची दुष्कृत्ये माहीत असूनही त्याकडे दुर्लक्ष केले,त्याच्याकडे जास्तीत जास्त लोक आकर्षित होतील याची काळजी घेतली.महसूल विभागाने जमीन विषयक कायद्याकडे दुर्लक्ष केले. शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी तर कहर केला, अशोक खरातला अस्ट्रॉनॉमीचं चांगलं ज्ञान असल्याने आपण त्याच्याकडे ज्योतिष बघण्यासाठी जात होतो असं त्यांचं म्हणणं आहे.

# ब्रेनवॉशिंगचा भडिमार, पण प्रबोधनाचे काय?



महाराष्ट्राला सामाजिक परिवर्तनाच्या चळवळींचा एक उत्तुंग वारसा आहे. समाजशास्त्रज्ञ मिलिंद बोकील मांडतात त्या प्रकारे याच्या किमान तीन मुख्य धारा आहेत. एक, महादेव गोविंद रानडे प्रणीत मंडळीकरण अथवा संस्थात्मक काम उभे करणे आणि त्याद्वारे सामाजिक सेवेचे वा इतर उपक्रम करणे. दोन, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांची विद्रोहाची परंपरा. आणि तीन, गोपाळ गणेश आगरकर, रघुनाथ धोंडो कर्वे यांची प्रबोधनाची, समाजात विवेकवादी विचार पसरवण्याची परंपरा. माझ्या मते आपल्याकडे एक चौथी धारादेखील आहे – ज्यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान व संशोधन यांचा समाजातले प्रश्न अभ्यासण्यासाठी आणि त्यावर उत्तरे शोधण्यासाठी उपयोग करण्यात आलाय. मात्र त्याविषयी नंतर कधीतरी.

गेल्या काही दशकांमध्ये होत असलेले सामाजिक कार्याचे बदलते स्वरूप बघता वरीलपैकी तिसरी परंपरा जरा अशक्त झाल्यासारखी दिसते. लोकांना विचार करायला प्रवृत्त करणे, सत्य – असत्य याची शहानिशा करणे, तथ्यांवर आधारित मांडणी व मुद्द्यांचा स्वीकार करणे, प्रश्न विचारणे तसेच प्रश्न विचारायला उद्युक्त करणे, जिज्ञासा व खुलेपणा यावर आधारित विचार प्रक्रिया घडविणे, इ. विविध पद्धतींनी समाजाला अधिक विवेकी व शहाणे करून सोडणे हे अत्यंत महत्त्वाचे काम जरा मागे पडले आहे. आपल्या अवतीभवती असलेला बाबा-बुवांचा सुळसुळाट, विविध सणांच्या आक्रमक उत्सवाचे वाढते स्तोम, आणि जीवनाच्या विविध अंगांमध्ये पसरलेली अवैज्ञानिकता हे बहुधा याचेच परिणाम आहेत. सोशल मीडिया व मार्केटिंगद्वारे प्रचाराचा भडिमार तर मोठ्या प्रमाणात होतो पण त्याचा उद्देश बऱ्याचदा 'पब्लिसिटी' वा 'ब्रेनवॉशिंग' असतो, प्रबोधन नाही.

या पार्श्वभूमीवर 'निर्माण क्विझ' हा एक वेगळा उपक्रम गडचिरोलीतल्या तरुणांसाठी आम्ही करून बघितला. गडचिरोली जिल्ह्यासमोरील महत्त्वाची आव्हाने, जिल्ह्यातील काही उत्तम सामाजिक कामे व कार्यरत युवा, जिल्ह्याच्या आजवरच्या इतिहासातील काही उत्तुंग बाबी (गडचिरोली म्हणजे निव्वळ मागास असे नाही हे कळण्यासाठी) आणि युवांच्या विकासासाठीचे काही महत्त्वाचे मुद्दे अशांवर आधारित २५ प्रश्न आम्ही काढले. गेल्या दोन वर्षात गडचिरोलीतील ७३ वेगवेगळ्या शाळा, कॉलेजेसमधील एकूण ६७०६ विद्यार्थ्यांसोबत आम्ही ही प्रश्नमंजूषा घेतली.

निव्वळ माहिती देण्याऐवजी प्रश्न विचारून कुतूहल निर्माण करणे व मग एका आकर्षक पॉवरपॉइंट प्रेझेंटेशनद्वारे उत्तरे समजावून सांगणे, गंमत यावी आणि लक्ष टिकून राहावे म्हणून स्पर्धात्मक खेळ करणे, मुला-मुलींनी एकमेकांची उत्तरे तपासणे व गुण देणे, आणि शेवटी पहिल्या तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांना पुस्तक भेट देणे असे या उपक्रमाचे स्वरुप होते. उपदेश देण्याऐवजी उत्सुकता पैदा करण्यावर भर होता. आजकाल अनेक ठिकाणी शिक्षकांकडून 'मुले लक्ष देत नाहीत' अशी तक्रार ऐकण्यास मिळते.

आम्हाला मात्र या 'गेमिफाईड एज्युकेटिव्ह क्विझ'ला तरुणांचा भरघोस प्रतिसाद मिळाला. ६१% युवांना एकूण गुणांपैकी ४०%हून कमी गुण आणि केवळ २% युवांना ८०%हून अधिक गुण मिळाले यावरून सध्या असलेला योग्य माहितीचा प्रचंड अभावदेखील दिसला. मात्र त्यावरील उत्तर त्रागा करण्यात, हताश होण्यात नसून प्रबोधनाच्या अभिनव कल्पना शोधण्यात व अंमलात आणण्यात आहे हे देखील जाणवले.

## थोडक्यात पण महत्वाचे




### 'कल्चर सर्कल'चे पुण्यात आगमन; लक्झरी रिटेल विस्ताराला नवी चालना

पुणे (आरंभ पर्व) : आशियातील आघाडीचा हायप आणि लक्झरी फॅशन प्लॅटफॉर्म 'कल्चर सर्कल'ने पुण्यात आपले पहिले फ्लॅगशिप स्टोअर सुरू करत रिटेल क्षेत्रात नवी पायरी गाठली आहे. कोपा मॉलमधील ब्रॉडवे येथे २१ मार्च २०२६ रोजी या स्टोअरचे उद्घाटन करण्यात आले. शहरातील प्रीमियम लाइफस्टाइल हबमध्ये उघडलेले हे स्टोअर कंपनीच्या ऑफलाइन विस्तार धोरणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. हे स्टोअर ग्राहकांना एक संपूर्ण लक्झरी शॉपिंग अनुभव देण्यासाठी खास डिझाइन करण्यात आले आहे. येथे प्रीमियम स्नीकर्स, लक्झरी हँडबॅग्स, उच्च दर्जाची घड्याळे आणि लोकप्रिय स्ट्रीटवेअर यांचा मोठा संग्रह उपलब्ध आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील एर्मेस, लुई वितों, शॅनेल आणि डिओर यांसारख्या ब्रँड्ससोबतच एअर जॉर्डन, यीजी, नायकी डंक आणि न्यू बॅलन्स यांसारखे लोकप्रिय स्नीकर्सही ग्राहकांना येथे मिळणार आहेत. ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी स्टोअरमधील प्रत्येक उत्पादनाची विशेष ऑथेंटिकेशन प्रणालीद्वारे तपासणी केली जाते.




### भारताचा फ्लेक्झिबल ऑफिस बाजार १०० दशलक्ष चौ.फुटांपलीकडे

पुणे (आरंभ पर्व) : भारताच्या फ्लेक्झिबल ऑफिस बाजारपेठेने महत्त्वाचा टप्पा गाठत 100 दशलक्ष चौरस फुटांचा आकडा ओलांडला आहे. 2020 ते 2025 या कालावधीत उपलब्ध जागेमध्ये तिप्पट वाढ होऊन हा आकडा 110 ते 114 दशलक्ष चौरस फुटांपर्यंत पोहोचल्याची माहिती फिक्की आणि सीबीआरई यांच्या संयुक्त अहवालात देण्यात आली. फिक्की इंडिया फ्लेक्झिबल वर्कस्पेस समिट 2026 दरम्यान 'फ्लेक्स-प्लोजन: इंडियाज फ्लेक्झिबल वर्कस्पेसेस एरा' हा अहवाल प्रकाशित करण्यात आला. या अहवालानुसार गेल्या पाच वर्षांत फ्लेक्झिबल ऑफिस क्षेत्रात 23 ते 25 टक्के चक्रवाढ वार्षिक दराने (CAGR) वाढ झाली आहे. अतुलनीय व्याप्ती, किफायतशीरपणा आणि वाढती संस्थात्मक परिपक्वता या वैशिष्ट्यांमुळे भारत जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या मोठ्या फ्लेक्झिबल वर्कस्पेस बाजारपेठांपैकी एक म्हणून उदयास येत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे.




### शहीदांच्या आदर्शातून राष्ट्रसेवा करा; तरुणांना मंजुश्री खर्डेकर यांचे आवाहन

पुणे (आरंभ पर्व) : भगतसिंह, सुखदेव आणि राजगुरू यांसारख्या क्रांतिकारकांनी देशासाठी दिलेल्या बलिदानातून प्रेरणा घेऊन तरुणांनी राष्ट्रसेवेत सक्रिय योगदान द्यावे, असे आवाहन ज्येष्ठ नगरसेविका मंजुश्री खर्डेकर यांनी केले. पतित पावन संघटनेतर्फे शहीद दिनानिमित्त कर्वे रस्त्यावरील सावरकर स्मारक येथे आयोजित अभिवादन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी संघटनेचे प्रांत सरचिटणीस नितीन सोनटक्के, प्रांत उपाध्यक्ष राजाभाऊ पाटील, शहराध्यक्ष श्रीकांत शिळीमकर यांसह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. खर्डेकर म्हणाल्या की, देशाच्या उभारणीसाठी सजग, सशक्त आणि संघटित समाजाची गरज असून, त्यात तरुणांची भूमिका महत्त्वाची आहे. क्रांतिकारकांच्या विचारांचे स्मरण ठेवून राष्ट्रसेवेचे व्रत पुढील पिढीने जपणे आवश्यक आहे. नितीन सोनटक्के यांनीही शहीदांच्या बलिदानाचे महत्त्व अधोरेखित करत तरुणांनी देशहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले. तसेच समाजात एकजूट वाढविण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीकांत शिळीमकर यांनी सांगितले की, वयाच्या अवघ्या २२व्या वर्षी देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या भगतसिंह, राजगुरू आणि सुखदेव यांच्या धैर्य, त्याग आणि राष्ट्रनिष्ठेचा वारसा पुढे नेणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत क्रांतिकारकांचे विचार पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

# कोविड कर्तव्यातील बलिदानाचा सन्मान

## ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ₹२५ लाखांचे अनुदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगरपालिकेच्या वतीने कोविड-१९ महामारीच्या काळात कर्तव्य बजावताना प्राण गमावलेल्या ११ कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ₹२५ लाखांचे आर्थिक अनुदान वितरित करण्यात आले. हा अनुदान वितरण सोहळा मा. महापौर मंजुषा दीपक नागपुरे यांच्या हस्ते पार पडला. कोविड-१९ च्या अभूतपूर्व संकटात महानगरपालिकेचे कर्मचारी जीवाची पर्वा न करता नागरिकांच्या सेवेसाठी अहोरात्र कार्यरत होते. या काळात अनेक कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण होऊन त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर महानगरपालिकेने "कोविड-१९ प्रतिबंध व उपचार सुरक्षा कवच" ही योजना कार्यान्वित केली होती. या योजनेअंतर्गत यापूर्वी ८८ कायम कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी ₹५० लाखांचे सहाय्य देण्यात आले होते. त्याच धर्तीवर आता कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांनाही आर्थिक मदत देण्याचा निर्णय मुख्य सभेने मंजूर केला असल्याची माहिती मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांनी दिली. महापौर नागपुरे यांनी आपल्या मनोगतात दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांप्रती संवेदना व्यक्त करत त्यांच्या कर्तव्यनिष्ठ सेवेला आदरांजली वाहिली. "कोविडच्या कठीण काळात कर्मचाऱ्यांनी जीवाची पर्वा न करता सेवा दिली. त्यांच्या त्यागामुळे शहरातील आरोग्य आणि अत्यावश्यक सेवा सुरळीत राहिल्या," असे त्यांनी नमूद केले. यावेळी सभागृह नेते गणेश बिडकर यांनीही दिवंगत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता व्यक्त करत, अशा संकटाच्या वेळी त्वरित मदत देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले. तसेच कामगार कल्याण विभागातील अधिकाऱ्यांनी कंत्राटी कामगारांना अनुदान मिळवून देण्यासाठी केलेल्या कार्याचे विशेष कौतुक करण्यात आले. दिवंगत कर्मचाऱ्यांच्या वारसांपैकी प्रियंका जाधव आणि चारुशीला सोनवणे यांनी प्रशासनाचे आभार मानत, ही मदत त्यांच्या कुटुंबासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले.




**या कार्यक्रमास मा. उपमहापौर परशुराम वाडेकर, स्थायी समिती सदस्य प्रशांत जगताप, सभासद सचिन दोडके, तसेच कामगार कल्याण विभागातील अधिकारी आणि दिवंगत कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते. महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे कोविड काळात जीव गमावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळाला असून, त्यांच्या त्यागाचा सन्मान करण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे मानले जात आहे.**

## पुणे कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांच्या उत्साहाला उधाण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मारुती सुझुकी अॅरेना प्रस्तुत आणि क्रंचीरोलचे पाठबळ असलेल्या बहुप्रतिक्षित पुणे कॉमिक कॉन २०२६ चा मेफिल्ड यश गार्डन येथे मोठ्या उत्साहात सुरू झाला. वीकेंडच्या निमित्ताने २१ आणि २२ मार्च रोजी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन दिवशी प्रचंड गर्दी झाली. कॉमिक्स, ॲनिमे, गेमिंग आणि पॉप कल्चरशी संबंधित सर्व गोष्टींचा आनंद साजरा करण्यासाठी चाहत्यांनी कार्यक्रमस्थळी गर्दी केली. त्यातून एका अविस्मरणीय वीकेंडची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या दिवशी चाहत्यांनी विशेष अशा "क्रिएटर्स अक्रॉस बॉर्डर्स" या सेगमेंटमध्ये जागतिक कॉमिक क्रिएटर जोश ब्लेलॉक यांच्याशी उत्साहाने



संवाद साधला. भारतीय क्रिएटर्सच्या सत्रांमध्ये, तसेच पुणे ॲनिमे कम्युनिटीने आयोजित केलेल्या संवादात्मक सत्रांमध्येही चाहत्यांचा मोठा सहभाग दिसून आला. कॉमिक कॉनमध्ये पहिल्या दिवशी मनोरंजन आणि प्रतिभेने संपन्न असे दमदार कार्यक्रम सादर झाले. यात स्टँड-अप कॉमेडियन सिद्धार्थ शेट्टीने आपल्या मार्मिक निरीक्षणात्मक विनोदाने आणि मंचावरील सहज वावराने प्रेक्षकांना खळखळून हसवले.




## १ एप्रिलपासून नवे आर्थिक नियम लागू

### एटीएम, यूपीआय, बँकिंग व्यवहारांवर परिणाम

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

नव्या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस म्हणजेच १ एप्रिलपासून देशभरात बँकिंग आणि आर्थिक व्यवहारांशी संबंधित अनेक महत्त्वाचे नियम बदलणार आहेत. या बदलांचा थेट परिणाम सर्वसामान्यांच्या दैनंदिन व्यवहारांवर होणार असून, एटीएम व्यवहार, यूपीआय, बचत खाते, क्रेडिट कार्ड, आयकर आणि डीमॅट खात्यांमध्ये नवे नियम लागू होणार आहेत. सर्वात मोठा बदल म्हणजे एटीएम व्यवहारांवरील मर्यादा. नव्या नियमांनुसार, इतर बँकेच्या एटीएममधून पैसे काढणे महिन्याला फक्त ३ वेळाच मोफत असेल. त्यानंतर प्रत्येक व्यवहारासाठी २० ते २५ रुपयांचे शुल्क आकारले जाईल. बँक खात्यांबाबतही नियम बदलत असून, किमान शिल्लक रकमेचे निकष नव्याने ठरवले जातील. मेट्रो, शहरी, निमशहरी आणि ग्रामीण भागानुसार वेगवेगळ्या मर्यादा लागू होतील. तसेच, ५० हजार रुपयांपेक्षा जास्त धनादेशांसाठी 'पॉझिटिव्ह पे सिस्टम' (PPS) अनिवार्य करण्यात येणार आहे, ज्यामुळे फसवणूक टाळण्यास मदत होईल. डिजिटल बँकिंगमध्येही मोठे बदल दिसणार आहेत. बँका ग्राहकांसाठी एआय-आधारित बँकिंग असिस्टंट आणि चॅटबॉट सेवा सुरू करणार असून, व्यवहार अधिक सोपे आणि जलद करण्यावर भर दिला जाणार आहे. यूपीआय वापरकर्त्यांसाठीही महत्त्वाचा नियम लागू होणार आहे. दीर्घकाळ वापरात नसलेल्या मोबाईल क्रमांकांशी जोडलेली यूपीआय खाती बंद करण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्राहकांनी आपले मोबाईल क्रमांक अपडेट ठेवणे आवश्यक ठरणार आहे.

क्रेडिट कार्डधारकांसाठीही काही बदल लागू होतील. एसबीआयच्या सिंपलीक्लिक कार्डवरील रिवॉर्ड पॉइंट्स कमी होणार असून, काही एअरलाइन संबंधित पॉइंट्समध्येही कपात करण्यात येणार आहे. आयकर व्यवस्थेतही बदल करण्यात आले आहेत. नव्या आर्थिक वर्षात जुनी कर व्यवस्था वापरायची असल्यास ती स्वतंत्रपणे निवडावी लागेल, अन्यथा करदाते आपोआप नव्या कर व्यवस्थेत समाविष्ट होतील. तसेच, पॅन आणि आधार लिंक नसल्यास लाभांश मिळणार नाही आणि टीडीएस कपात वाढू शकते. डीमॅट खात्यांसाठी केवायसी आणि नामांकन प्रक्रिया कडक करण्यात आली आहे, ज्यामुळे गुंतवणूक अधिक सुरक्षित होईल. याशिवाय, अनेक बँकांनी बचत खाते आणि मुदत ठेवींवरील व्याजदर ठरवण्याच्या पद्धतीत बदल केले असून, खात्यातील रकमेच्या आधारे व्याज मिळण्याची शक्यता वाढली आहे. एकूणच, १ एप्रिलपासून लागू होणारे हे नवे नियम बँकिंग व्यवहार अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि डिजिटल करण्याच्या दिशेने एक मोठे पाऊल मानले जात आहे. मात्र, ग्राहकांनी या बदलांची माहिती घेऊन त्यानुसार आपले आर्थिक नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे.

## पीनट बटर रेंज लाँच करत न्युट्रिकाने आपल्या वेलनेस पोर्टफोलिओचा विस्तार केला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वात वेगाने वाढणारा 'वेलनेस फर्स्ट' एफएमसीजी (FMCG) ब्रँड बीएन अॅग्रीटेकचा जीवनशैली आणि वेलनेस ब्रँड 'न्युट्रिका'ने, न्युट्रिका पीनट बटर लाँच करत पीनट बटर श्रेणीत प्रवेश करण्याची घोषणा केली आहे. ही रेंज दैनंदिन आरोग्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी चव, गुणवत्ता आणि उपयुक्तता यांचा मेळ घालणारा एक परिपूर्ण वेलनेस पोर्टफोलिओ तयार करण्याच्या दिशेने ब्रँडचे पुढचे पाऊल आहे. न्युट्रिका पीनट बटर आता दिल्ली, मुंबई, पुणे आणि चंदीगडसह 14 शहरांमधील जनरल ट्रेड स्टोअर्समध्ये (किरकोळ दुकानांमध्ये) उपलब्ध आहे. क्रंची आणि क्रीमी अशा दोन प्रकारांमध्ये उपलब्ध असलेली ही नवीन पीनट बटर रेंज, दैनंदिन फिटनेससाठी एक आरोग्यदायी स्नॅकिंगचा पर्याय देते, ज्यामुळे पोषण सोपे आणि आनंददायी बनते. फिटनेस केवळ जिमपुरता किंवा एखाद्या व्यक्तीपुरता मर्यादित नसून, ती एक दैनंदिन सवय आहे जी लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत संपूर्ण कुटुंब अंगीकारू शकते. रोजच्या स्प्रेड्सऐवजी पीनट बटरचा वापर करणे हा एक छोटासा आणि सोपा बदल आहे, जो घरातील सर्वांना एक आरोग्यदायी पर्याय देतो आणि संपूर्ण जीवनशैलीत एक मोठा, दीर्घकालीन सकारात्मक बदल घडवून आणतो. हे दोन्ही प्रकार प्रथिनांनी (प्रोटीन) युक्त, फायबरने समृद्ध आणि 100% शाकाहारी घटकांपासून बनवलेले आहेत. तसेच यात कोणतेही कृत्रिम प्रिझर्व्हेटिव्ह्ज (संरक्षक) नाहीत, ज्यामुळे ते सक्रिय जीवनशैलीसाठी एक पौष्टिक आणि ऊर्जादायी पर्याय ठरतात. ही रेंज 300g, 750g आणि 900g च्या सोयीस्कर पीईटी (PET) जारमध्ये उपलब्ध आहे. या लाँचवर भाष्य करताना, न्युट्रिकाचे संचालक आणि बिझनेस हेड स्पर्श सचर म्हणाले, "आम्ही बाजारात आणत असलेल्या प्रत्येक उत्पादनासोबतच आरोग्य सर्वांसाठी अधिक सोपे, सहज उपलब्ध आणि आनंददायी बनवणे हे आमचे ध्येय आहे. पौष्टिक अन्न चविष्टही असू शकते, या आमच्या विश्वासाचे हे पीनट बटर रेंज एक उत्तम उदाहरण आहे. आम्हाला ग्राहकांसाठी आरोग्यदायी पर्याय निवडणे सोपे आणि उत्साहवर्धक बनवायचे आहे, ज्यासाठी त्यांना कोणतीही तडजोड करावी लागू नये. आधुनिक जीवनशैलीत सहजपणे सामावून जाणारा वेलनेस ब्रँड तयार करण्याच्या दिशेने हे लाँच म्हणजे आणखी एक पाऊल आहे." न्युट्रिका बी हनी आणि जीवनसत्त्वयुक्त कुकिंग ऑइल्सच्या (खाद्यतेल) यशानंतर न्युट्रिकाने पीनट बटर श्रेणीत प्रवेश केला आहे, ज्यामुळे ब्रँडचा फंक्शन-फर्स्ट वेलनेस पोर्टफोलिओ अधिक मजबूत झाला आहे. या विस्तारामुळे, दर्जेदार परंतु सर्वांना परवडणारी उत्पादने देत न्युट्रिकाची एक सर्वसमावेशक जीवनशैली आणि वेलनेस ब्रँड बनण्याकडची वाटचाल सुरूच आहे.




## कार्यक्रमातून भारतीय संस्कृतीचे दैदीप्यमान दर्शन

- **संगीत, नृत्य आणि नाट्याचा संगम; "रामायण" सादरीकरणाने मंत्रमुग्ध प्रेक्षक**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

"भारताचे रंग, एकलव्या संगतीने" हा अनोखा सांस्कृतिक कार्यक्रम कोथरूड येथील स्वामी विवेकानंद सभागृह येथे मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात आदिवासी कलाकारांनी रामायण या महान महाकाव्यावर आधारित सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली. फ्रेंड्स ऑफ ट्रायबल्स सोसायटी'च्या पुणे शाखेच्या वतीने सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर, घोडेगाव तसेच अकोले, अहिल्यानगर, मुरबाड आणि ठाणे येथील आदिवासी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक गणेश वंदनेने झाली, ज्यामुळे वातावरण भक्तिमय झाले. त्यानंतर देशभक्तीपर गीतांनी उपस्थितांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागवली. एकल अभियानांतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या तरुण-तरुणींच्या चमूने संगीत, नृत्य आणि नाट्यमय कथनाच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडवले. राम, सीता आणि हनुमान यांसारख्या पात्रांचे सजीव सादरीकरण विशेष आकर्षण ठरले.

# ८५० ग्रॅम वजनाच्या अतिदुर्मिळ प्रीमॅच्युअर बालिकेला जीवनदान

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे येथील अत्याधुनिक नवजात अतिदक्षता विभागाच्या (एनआयसीयू) मदतीने केवळ ८५० ग्रॅम वजनाच्या आणि अत्यंत गंभीर अवस्थेत जन्मलेल्या नवजात बालिकेला यशस्वीरित्या जीवनदान देत डिस्चार्ज देण्यात आला आहे. ही घटना आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञान आणि तज्ज्ञांच्या समन्वयित प्रयत्नांचे उत्कृष्ट उदाहरण ठरली आहे.

ही बालिका अवघ्या २६ आठवडे ४ दिवसांच्या गर्भावस्थेत जन्माला आली होती. जन्मानंतर तिला तातडीने ९ जानेवारी २०२६ रोजी एनआयसीयूमध्ये दाखल करण्यात आले. बालिकेची आई मंगला भांगे (वय ४३ वर्षे) यांना पूर्वी अनेक वैद्यकीय गुंतागुंतींचा सामना करावा लागला होता. आयव्हीएफ अपयश, खराब प्रसूती इतिहास, उच्च रक्तदाब, गर्भावस्थेतील मधुमेह (GDM), हायपोथायरॉईडिझम आणि सर्व्हिकल इनकॉम्पिटन्स यांसारख्या समस्यांमुळे ही प्रसूती अतिजोखमीची ठरली होती. प्री-एक्लेम्पसियामुळे परिस्थिती आणखी गंभीर बनली होती.

ही गुंतागुंतीची प्रसूती डॉ. मधुश्री माने आणि डॉ. शारयू यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. त्यानंतर बालिकेच्या उपचारांची जबाबदारी डॉ. दत्तात्रय कुलकर्णी (निओनॅटोलॉजिस्ट) यांनी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली एनआयसीयू टीमने अत्यंत आव्हानात्मक परिस्थितीत उपचार करत बालिकेची प्रकृती स्थिर केली. उपचारादरम्यान बालिकेला अनेक गंभीर समस्यांचा सामना करावा लागला. त्यामध्ये रेस्पिरेटरी डिस्ट्रेस सिंड्रोम (RDS) साठी सर्फॅक्टंट, एनआयव्ही, सीपॅप आणि तब्बल २६ दिवस ऑक्सिजन सपोर्ट देण्यात आला. तसेच सबगेलियल ब्लीड, ॲसिनेटोबॅक्टर सेप्सिस, हेमोडायनामिकली सिग्निफिकंट पीडीए, एपनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी आणि ऑस्टिओपेनिया ऑफ प्रीमॅच्युरिटी यांसारख्या गुंतागुंतींचे यशस्वी व्यवस्थापन करण्यात आले. संपूर्ण उपचार काळात आईच्या दुधावर आधारित पोषण देण्यात आले.

सुमारे दोन महिन्यांच्या अथक उपचारानंतर बालिका ३५ आठवडे २ दिवसांच्या करेक्टेड गर्भावस्थेपर्यंत पोहोचली असून तिचे वजन वाढून १८२५ ग्रॅम झाले आहे. डिस्चार्जपूर्व तपासणीत ग्रेड १ पीव्हीएल, झोन ३ आरओपी (निरीक्षणाखाली) असून इको अहवाल सामान्य आढळला आहे. सध्या बालिकेची प्रकृती स्थिर असून तिला १० मार्च २०२६ रोजी यशस्वीरित्या डिस्चार्ज देण्यात आला.

या यशामागे एनआयसीयूतील डॉक्टर, आरएमओ, नर्सिंग स्टाफ आणि संपूर्ण वैद्यकीय टीमचे समन्वयित व समर्पित प्रयत्न महत्त्वाचे ठरले. तसेच डॉ. व्यास मोरया (सेंटर हेड) आणि डॉ. पूजा (मेडिकल सुपरिंटेंडंट) यांच्या नेतृत्वाखाली हॉस्पिटल व्यवस्थापनाचेही मोलाचे सहकार्य लाभले. ही यशोगाथा केवळ एका बालिकेच्या जीवनरक्षणाची नाही, तर अत्याधुनिक नवजात आरोग्यसेवा आणि तज्ज्ञांच्या कौशल्याची जिवंत साक्ष ठरली आहे.






दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २५ मार्च २०२६






## थोडक्यात पण महत्वाचे



### रुपाली चाकणकर यांची फेसबुक पोस्ट चर्चेत

खडकवासला (आरंभ पर्व) : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका पोस्टमुळे सध्या राजकीय व सामाजिक वर्तुळात चर्चा रंगली आहे. आपल्या कुटुंबावर होत असलेल्या टीकेबाबत नाराजी व्यक्त करत त्यांनी स्पष्ट शब्दांत प्रतिक्रिया दिली आहे. चाकणकर यांनी फेसबुक पोस्टमध्ये म्हटले आहे की, सार्वजनिक जीवनात काम करत असताना टीका होणे स्वाभाविक आहे; मात्र त्या टीकेचा विस्तार कुटुंबापर्यंत करणे अत्यंत चुकीचे आणि भयावह आहे. "माझ्यासह माझ्या कुटुंबाला त्रास देणं हे अमानवीय आहे," असे त्यांनी नमूद केले. या पोस्टनंतर सोशल मीडियावर विविध प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. काहींनी त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला असून, वैयक्तिक आयुष्यावर टीका टाळण्याची गरज व्यक्त केली आहे. तर काहींनी सार्वजनिक व्यक्तींनी टीका सहन करण्याची तयारी ठेवावी, असे मत मांडले आहे. दरम्यान, या प्रकरणामुळे सोशल मीडियावरील संवादाची मर्यादा आणि जबाबदारी यावर पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे.

### 'अतिक्रमणावरील कारवाई हा फक्त दिखावा'; संदीप खर्डेकर यांची टीका

पुणे (आरंभ पर्व) : शहरातील अतिक्रमणाविरोधात महापालिकेकडून केली जाणारी कारवाई ही केवळ दिखावा असून ती तात्पुरती डागडुजी असल्याची टीका भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते संदीप खर्डेकर यांनी केली आहे. "कारवाई म्हणजे बोलाची कढी आणि बोलाचाच भात" अशी उपरोधिक टिप्पणी करत त्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. नदीपात्रातील अनधिकृत व्यवसाय तसेच कर्वेनगर, ताठवडे उद्यान परिसरातील फ्रंट आणि साइड मार्जिनमधील शेड्सवर कारवाई करण्यात आली. मात्र, ही कारवाई दीर्घकालीन न ठरता केवळ काही दिवसांतच परिस्थिती पूर्ववत होत असल्याचे दिसून येत आहे. कारवाईनंतर जप्त केलेले साहित्य दुसऱ्याच दिवशी संबंधित व्यावसायिकांना परत मिळते, असा आरोप करत महापालिकेचे धोरण काय आहे, याचा खुलासा करावा, अशी मागणी खर्डेकर यांनी केली आहे. तसेच, नियमबाह्य व्यवसायांना महापालिकेची मान्यता आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. शहरातील अतिक्रमणावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी ठोस आणि सातत्यपूर्ण कारवाईची गरज असून, अन्यथा नागरिकांचा विश्वास प्रशासनावरून उडत चालल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

### तहसीलदार, प्रांतांच्या आदेशांची चौकशी; महसूल विभागाची कारवाई

पुणे (आरंभ पर्व) : महसूल विभागात पारदर्शकता वाढवण्यासाठी आणि नागरिकांच्या तक्रारींना न्याय देण्यासाठी तहसीलदार व प्रांत अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांची सखोल चौकशी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. महसूल मंत्र्यांच्या निर्देशानुसार मागील पाच वर्षांतील विविध प्रकरणांचा तपास केला जाणार असून, यामुळे प्रशासनात खळबळ उडाली आहे. या तपासाअंतर्गत अर्ज दाखल झाल्यानंतर तातडीने निकाली काढलेली प्रकरणे, ऑनलाईन प्रणालीद्वारे मंजूर झालेल्या अर्जांची पडताळणी तसेच नोटीस न देता दिलेले आदेश यांचा विशेष आढावा घेतला जाणार आहे. जिल्हाधिकारी स्तरावरून या प्रक्रियेचे नियंत्रण केले जाणार असून संबंधित अधिकाऱ्यांकडून स्पष्टीकरणही मागवले जाणार आहे. विशेष म्हणजे, राज्यातील अनेक जिल्ह्यांमधील प्रकरणांची निवड करून त्यांचे नमुने तपासले जातील. त्यामध्ये नियमबाह्य निर्णय, अधिकारांचा गैरवापर किंवा प्रक्रियेत झालेल्या त्रुटी आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे महसूल विभागातील कामकाज अधिक पारदर्शक होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच नागरिकांना न्याय मिळण्यास मदत होईल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

# जिद्द, चिकाटी आणि खाकीचे स्वप्न

## शिर्डीच्या परवीन शेख यांची मुंबई पोलीस दलात झेप!

**अहिल्यानगर-सालीख शेख (दै. आरंभ पर्व)**

इच्छा तिथे मार्ग' ही म्हण आपण अनेकदा ऐकतो, पण ती प्रत्यक्षात उतरवून दाखवली आहे परवीन सांडू शेख या २२ वर्षीय तरुणीने. घरची बेताची परिस्थिती, मर्यादित साधने आणि समाजातील आव्हाने, या सर्वांवर मात करत परवीनने केवळ १२ वी उत्तीर्ण असतानाच अडीच वर्षांच्या कठोर परिश्रमानंतर महाराष्ट्र पोलीस दलात 'कॉन्स्टेबल' म्हणून आपली जागा निश्चित केली आहे. नुकताच नागपूर येथे त्यांचा दीक्षांत संचलन सोहळा पार पडला असून, आता त्या मुंबई शहरात आपली सेवा बजावण्यासाठी सज्ज झाल्या आहेत.

परवीन यांचे १० वी आणि १२ वीचे शिक्षण शिर्डीतील श्री साईनाथ माध्यमिक विद्यालयात झाले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न उराशी बाळगले. मात्र, हा प्रवास सोपा नव्हता. कौटुंबिक परिस्थिती जेमतेम असतानाही त्यांनी कधीही हार मानली नाही.

परवीनचा प्रवास सोपा नव्हता. वय अवघे २२ वर्षे. पदवी नाही, फक्त १२ वी उत्तीर्ण. घरची आर्थिक परिस्थिती जेमतेम असताना, पोलीस होण्याचे स्वप्न पाहणे हेच मुळात मोठे धाडस होते. मात्र, परिस्थितीने परवीनला खचवले नाही, तर अधिक मजबूत केले. आपल्या गरिबीला अडसर न मानता, तिने त्यालाच आपली ताकद बनवले आणि खाकी वर्दी मिळवण्याची जिद्द मनात बाळगली.

प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या मागे कुणाचा तरी हात असतो, परवीनच्या मागे तिचे वडील खंबीरपणे उभे राहिले. तिचे वडीलच तिचे पहिले मार्गदर्शक बनले. अभ्यास कसा करावा, सातत्य कसे ठेवावे, याबाबत त्यांनी परवीनला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. परीक्षेच्या तयारीसाठी परवीनने 'B & W Academy' मध्ये काही काळ मार्गदर्शन घेतले, परंतु अभ्यासाचा मोठा हिस्सा तिने स्वतःहून पूर्ण केला.

पोलीस भरतीमध्ये लेखी परीक्षेइतकेच महत्त्व मैदानी चाचणीला असते. अनेकजण यासाठी महागडे क्लासेस आणि प्रशिक्षक लावतात. मात्र, परवीनने अभ्यासाप्रमाणेच मैदानी सराव (Ground Training) देखील पूर्णपणे स्वतःच्या हिमतीवर केला. पहाटे उठून धावणे, व्यायामाचे कठोर वेळापत्रक पाळणे, हे तिने अडीच वर्षे न थकता केले. तिच्या या 'सेल्फ-मेड' तयारीनेच तिला यशाच्या शिखरावर पोहोचवले.



पोलीस भरती प्रक्रिया अत्यंत स्पर्धात्मक आणि थकवणारी असते. अडीच वर्षे सतत प्रयत्न, अपयशाची भीती आणि समाजाच्या नजरा, या सर्व गोष्टींचा सामना करत परवीनने आपले लक्ष ढळू दिले नाही. अखेर तिच्या कष्टाला फळ मिळाले आणि तिची मुंबई शहरात पोलीस कॉन्स्टेबल म्हणून निवड झाली. हे केवळ तिचे यश नव्हते, तर तिच्या कुटुंबाच्या कष्टाचे आणि विश्वासाचे चीज होते.


निवडीनंतर परवीनने नागपूर येथे ९ महिन्यांचे अत्यंत खडतर असे पोलीस प्रशिक्षण पूर्ण केले. शिस्त, शारीरिक क्षमता आणि कायद्याचे ज्ञान आत्मसात केल्यानंतर, नुकताच त्यांचा दीक्षांत संचलन सोहळा पार पडला. या सोहळ्यात खाकी वर्दीत संचलन करताना परवीनच्या चेहऱ्यावर दिसणारा अभिमान आणि समाधान तिच्या संघर्षाची कहाणी सांगत होता.

परवीन शेख यांचा हा प्रवास केवळ एका नोकरी मिळवण्याचा प्रवास नाही. तो अभावग्रस्त परिस्थितीत जगणाऱ्या, १२ वी नंतर काय करावे या विवंचनेत असणाऱ्या हजारो ग्रामीण आणि शहरी तरुणींसाठी एक मोठा संदेश आहे. जर मनात जिद्द असेल, कुटुंबाचा पाठिंबा असेल आणि स्वतःवर विश्वास असेल, तर कोणतीही परिस्थिती तुम्हाला तुमचे स्वप्न पूर्ण करण्यापासून रोखू शकत नाही, हे परवीनने सिद्ध केले आहे. मुंबई शहर पोलीस दलात रुजू होणाऱ्या या नवीन 'लेडी सिंघम'ला पुढील वाटचालीस खूप खूप शुभेच्छा!

## क्रॉम्प्टनचा 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर लाँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

धावपळीच्या जीवनशैलीत संतुलित पोषण राखणे कठीण होत असताना क्रॉम्प्टन ग्रीव्हज कंझ्युमर इलेक्ट्रिकल्स लिमिटेडने 'हेल्दी चॉईसेस मेड ईजीयर' या उपक्रमांतर्गत 'अमिओ फ्रेश' कोल्ड प्रेस ज्यूसर बाजारात आणला आहे. हा ज्यूसर कोल्ड प्रेस तंत्रज्ञानावर आधारित असून फळे, भाज्या आणि नट्समधील आवश्यक पोषक घटक, जीवनसत्त्वे आणि अँटी-ऑक्सिडंट्स टिकवून ठेवण्यास मदत करतो. पारंपरिक ज्यूसिंग पद्धतींमध्ये उष्णता आणि



- **आरोग्यदायी जीवनशैलीसाठी नवा पर्याय**

उच्च गतीमुळे पोषणाचा ऱ्हास होत असताना, अमिओ फ्रेश सुमारे 90 टक्क्यांपर्यंत पोषक तत्वे जतन करतो, असे कंपनीने सांगितले. या ज्यूसरमध्ये 200 वॅटची स्लो मोटर आणि ड्युअल-फिल्टर डिझाइन असून अधिक रस आणि उत्तम गुणवत्ता मिळते. 108 मिमी रुंद फीड चूटमुळे फळे-भाज्या मोठ्या प्रमाणात कापण्याची गरज नसते. तसेच नट मिल्कसारखे विविध पेय तयार करण्याची सुविधाही यात आहे.

## राज ठाकरेंचा 'विश्वासू शिलेदार' पुन्हा जळगावच्या मैदानात

### गजानन राणे यांची जिल्हा संपर्क अध्यक्षपदी वर्णी

**जळगाव-सागर नानोटे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे आक्रमक कामगार नेते आणि कुशल संघटक गजानन राणे यांची जळगाव जिल्हा संपर्क अध्यक्षपदी पुनश्च नियुक्ती करण्यात आली आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जाणारे राणे आता जळगाव जिल्ह्याच्या पक्षविस्ताराची धुरा सांभाळणार असून, त्यांच्या या निवडीमुळे जिल्ह्यातील मनसैनिकांमध्ये नवचैतन्य पसरले आहे. गजानन राणे यांनी यापूर्वी २०१३ मध्ये देखील जळगाव जिल्ह्याचे संपर्क



अध्यक्षपद अत्यंत समर्थपणे भूषवले होते. जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, राजकीय समीकरणे आणि स्थानिक कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे जुने ऋणानुबंध पाहता, राज ठाकरेंनी त्यांच्या अनुभवावर पुन्हा एकदा विश्वास टाकला आहे. जुन्या जाणत्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेऊन आणि नव्या रक्ताला उभारी देण्यात राणेंचा हातखंडा मानला जातो. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर त्यांची ही नियुक्ती महत्त्वाची ठरणार आहे. कामगारांच्या हक्कासाठी आक्रमकपणे लढणारे नेतृत्व म्हणून गजानन राणे यांची ओळख आहे. मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांमध्ये कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात त्यांनी दिलेले लढे सर्वश्रुत आहेत. प्रशासकीय आणि व्यावसायिक पातळीवर सामान्यांचे प्रश्न सोडवताना त्यांनी नेहमीच 'मनसे स्टाईल'ने आक्रमक भूमिका घेतली आहे.

#### नवी ऊर्जा

**स्पष्टवक्तेपणा, परखड विचार आणि माणसं जोडण्याची विलक्षण कला ही राणेंच्या कार्यशैलीची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या नियुक्तीमुळे जळगाव जिल्ह्यातील मरगळलेल्या संघटनाला नवी उभारी मिळणार आहे. गजानन राणे यांच्या निवडीबद्दल सर्वच स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभर मनसेचे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.**

## महाराष्ट्राचा पहिला मराठी पॉप कल्चर फेस्टिव्हल सज्ज

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्रातील मराठी पॉप कल्चरला समर्पित असा पहिलाच फेस्टिव्हल 'राडा २०२६' पुण्यात रंगणार असून, मराठी तरुणांसाठी हा एक मोठा सांस्कृतिक उत्सव ठरणार आहे. भाडीपा (भारतीय डिजिटल पार्टी) प्रस्तुत हा दोन दिवसीय फेस्टिव्हल २८ आणि २९ मार्च २०२६ रोजी बालेवाडी येथील द ऑर्किड हॉटेलमध्ये प्रथमच आयोजित करण्यात येणार आहे.

मराठी कलाकार, कॉमेडियन, डिजिटल क्रिएटर्स आणि पॅनेलिस्ट यांना एकत्र आणणारा हा उत्सव 'मराठी इंटरनेट'चा प्रत्यक्ष अनुभव देणार आहे. जागतिक स्तरावर मराठी टॅलेंटची वाढती छाप लक्षात घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे.




या फेस्टिव्हलमध्ये मराठी रॉकस्टार अवधूत गुप्ते, लोकप्रिय यूट्यूबर प्राजक्ता कोळी, डीजे क्रेटेक्स, रॅपर यंग डीएसए, 'हसल २.०' फेम सृष्टी तावडे, यशराज मुखाटे आणि नील साळेकर यांसारखे नामांकित कलाकार सहभागी होणार आहेत. तसेच 'कास्टिंग काउच' मालिकेतील अभिनेते अमेय वाघ आणि निपुण धर्माधिकारी यांचीही उपस्थिती असणार आहे. भाडीपाचे सह-संस्थापक सारंग साठ्ये आणि पॉला मॅकग्लिन यांनी सांगितले की, "मराठी टॅलेंट आज जगभर झळकत असले तरी त्याचा उत्सव साजरा करण्यासाठी व्यासपीठ नव्हते. 'राडा' हा त्याच दिशेने एक महत्त्वाचा प्रयत्न आहे." या फेस्टिव्हलमध्ये लाईव्ह परफॉर्मन्सेस, चर्चासत्रे आणि कलाकार-चाहत्यांमधील थेट संवाद यामुळे मराठी पॉप कल्चरला नवी दिशा मिळणार आहे. जागतिक पातळीवर मराठी संस्कृती पोहोचविण्यासाठी 'राडा २०२६' हा एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे.

## ग्रामपंचायत खोरवडी ता. दौंड, जि. पुणे

**B१ पेपर नोटीस क्रमांक १ सन २०२५-२६**

ग्रामपंचायत खोरवडी ता. दौंड जि. पुणे यांचेकडून खालील नमूद केलेल्या कामांची निविदा पद्धतीने (दोन) सिलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत खोरवडी ता. दौंड जि. पुणे यांचेकडून दिनांक २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत देण्यात येतील व दिनांक २४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यंत पोस्टाने/समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सिलबंद निविदा ग्रामपंचायत सोयीनुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा विक्री करण्याचा कालावधी | निविदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ गावठाण शाळा शौचालय बांधणे | २०००००/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| २ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ अनिल भंडगर घर ते मुख्यरस्ता ड्रेनेज करणे | २०००००/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ३ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ विजय बाबर ते मुख्य रस्ता बंदिस्त गटर करणे | २०००००/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ४ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ गावठाण अंतर्गत पिण्याच्या पाणी पाईप लाईन करणे | ४८९४८४/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ५ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ जठार वस्ती वागदारा रस्ता कॉंक्रीटीकरण करणे | २५००००/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ६ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ ग्रामपंचायत इमारत दुरुस्ती करणे | १७२३८१/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ७ | १५वा वित्तआयोग २०२५/२६ ग्रामपंचायत फर्निचर करणे | ४५०००/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |
| ८ | (दलित वस्तीसुधार योजना) २५/२५ झुंबर सकट वस्ती सिमेंट रस्ता करणे (दलित वस्तीसुधार योजना) | ८४५९०१/- | दि.२४/०३/२०२६ ते ३०/०३/२०२६ | १००/- | सूट सु.बे.अ |

निविदा अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

१) कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२) कोऱ्या निविदा फी ग्रामपंचायत कार्यालयात रोख भरल्यानंतर उपलब्ध होतील तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील.
३) यापूर्वी केलेल्या कामाचे पूर्णत्वाचे दाखले जोडावेत.
४) इसारा रक्कम ग्रामपंचायत खोरवडी किंवा ग्रामपंचायत नावे धनादेश/डी.डी. जोडण्यात यावा. तसे न केल्यास आपल्या निवेदेचा विचार केला जाणार नाही.
५) आपण तांत्रिक लिफाफा व आर्थिक लिफाफा वेगवेगळा सदर करणे आवश्यक आहे. तांत्रिक लिफाफा प्रथम उघडण्यात येईल आपण सर्व नियमास पात्र झाल्यानंतर आर्थिक लिफाफा उघडण्यात येईल. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्वीकारणेचा अथवा नाकारनेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत खोरवडी यांनी राखून ठेवला आहे.

सही/-
ग्रामसेवक
ग्रामपंचायत खोरवडी ता. दौंड जि. पुणे

सही/-
प्रशासन
ग्रामपंचायत खोरवडी ता. दौंड जि. पुणे

## भारतीय चिकित्सा पद्धतींना जागतिक मान्यता : उपराष्ट्रपती राधाकृष्णन

**उरुळी कांचन (दै. आरंभ पर्व)**

भारतीय पारंपरिक चिकित्सा पद्धतींना जागतिक स्तरावर मान्यता मिळत असल्याचे प्रतिपादन भारताचे उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केले. उरुळी कांचन येथील निसर्गोपचार ग्राम सुधार ट्रस्टच्या ८१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.





आरोग्य रक्षणासाठी आयुष मंत्रालयातर्फे योग, आयुर्वेद आणि निसर्गोपचार यांसारख्या पद्धती प्रभावी ठरत असून, शारीरिक व मानसिक स्वास्थ्य जपण्याची मोठी क्षमता या पद्धतींमध्ये आहे, असे त्यांनी नमूद केले. ऍलोपॅथी उपचार पद्धती आवश्यक असली तरी भारतीय चिकित्सा पद्धतींचे महत्त्वही तितकेच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महात्मा गांधी यांनी ८१ वर्षांपूर्वी उरुळी कांचन येथे निसर्गोपचार पद्धतीची सुरुवात केली होती. आजही हा आश्रम आरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण कार्य करीत असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली आयुष मंत्रालयात झालेल्या बदलांमुळे योग, आयुर्वेद आणि निसर्गोपचाराला जागतिक स्तरावर मान्यता मिळाली असल्याचेही त्यांनी नमूद केले. जीवनात साधेपणा आणि शिस्त महत्त्वाची असून, गरजा मर्यादित ठेवण्याचा सल्लाही त्यांनी दिला. यावेळी निसर्गोपचार आश्रमाचे प्रमुख विश्वस्त डॉ. एन. जी. हेगडे यांनी प्रास्ताविकात आश्रमाच्या कार्याचा आढावा घेतला. महात्मा गांधी यांनी डॉ. मणीभाई देसाई यांच्याकडे जबाबदारी सोपविल्यानंतर त्यांनी 'बायफ'सारख्या संस्थांद्वारे ग्रामीण आरोग्य, ग्रामविकास, दुग्धोत्पादन आणि पर्यावरण क्षेत्रात मोठे योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात 'सीक्रेट्स ऑफ हॅपिनेस' या पुस्तकाचे प्रकाशन उपराष्ट्रपतींच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी राज्यपाल विष्णू देव वर्मा, राज्यसभेचे उपाध्यक्ष हरिवंश सिंह, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार ज्ञानेश्वर कटके, डॉ. भावार्थ देखणे, डॉ. अभिषेक देवीकर यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्त्वाचे




### “अंधश्रद्धेपोटी पशुबळी देऊ नये” – डॉ. कल्याण गंगवाल यांचे आवाहन

पुणे (आरंभ पर्व) : महाराष्ट्रातील जागृत देवी म्हणून गणल्या गेलेल्या कार्ला (लोणावळा) येथील कुलस्वामिनी एकवीरा देवीची वार्षिक यात्रा दि. २४ ते २६ मार्च २०२६ या कालावधीत संपन्न होत असून, देवीचा नवस फेडण्यासाठी तिथे भाविकांनी पशु व पक्षी यांचा बळी देऊ नये व अंधश्रद्धेला खतपाणी घालू नये, असे आवाहन सर्व जीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ. कल्याण गंगवाल यांनी केले आहे. कुलस्वामिनी एकवीरा देवीच्या वार्षिक यात्रेत दरवर्षी लाखो भाविक तेथे जमतात. नवस फेडण्यासाठी हजारो भाविक कोंबड्या, बकऱ्या आदींचा बळी देतात. या प्रथेविरोधात जागृती करण्यासाठी डॉ. गंगवाल यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्ते यात्रास्थळी जाऊन पत्रके वाटणार, बॅनर लावणार तसेच भाविकांशी संवाद साधून या अनिष्ट प्रथेबाबत त्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करणार आहेत. या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रीमंडळातील प्रमुख मंत्री, कुलस्वामिनी एकवीरा देवी मंदिर ट्रस्टचे प्रमुख तसेच जिल्हाधिकारी आणि ग्रामीण पोलीस प्रमुख यांना निवेदने पाठविण्यात आली आहेत. यात्रेदरम्यान होणारा दारूचा वापर आणि पशुबळी थांबवण्यासाठी प्रशासनाने व मंदिर ट्रस्टने कडक धोरण राबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

### कंटेनरच्या बॉडीला गळफास घेऊन आत्महत्या

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : शहराजवळील तुकाईवाडी रस्त्यावर एका अनोळखी व्यक्तीने कंटेनर गाडीच्या बॉडीला नायलॉनच्या दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्षे असून, त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. खेड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रविवारी (दि. २२ ) सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास तुकाईवाडी गावाच्या हद्दीत नवीन बायपास जवळ उभ्या असलेल्या कंटेनर (क्रं. एच.आर.- ५५, ए. के. ३२८३ ) च्या डाव्या बाजूच्या बॉडीला नायलॉनच्या दोरीने गळफास घेतलेल्या अवस्थेत एक अनोळखी व्यक्ती आढळली. या घटनेची माहिती स्थानिक ग्रामस्थ करण सांडभोर यांनी वरची भांबुरवाडी येथील पोलीस पाटील सचिन वाळुंज यांना कळवली. सचिन वाळुंज यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. संबंधीत मृत व्यक्तीच्या अंगावर फुल बाह्यांचा निळ्या आणि गुलाबी पट्ट्यांचा रंगीबेरंगी शर्ट, निळ्या रंगाची फुल पँट आणि तांबड्या रंगाची चप्पल होती. त्यानंतर त्यांनी खेड पोलीस स्टेशनला घटनेची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी येऊन प्रेत खाली आणले आणि ते चांडोली ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे घोषित केले. मृत्यूचे कारण गळफास असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मृत व्यक्ती अनोळखी व्यक्तीची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेज, आसपासच्या लोकांची विचारपूस आणि इतर तांत्रिक बाबींच्या आधारे तपास सुरू आहे. कंटेनर गाडी हरियाणा राज्यातील असून, त्याचा मालक किंवा चालक यांच्याशी संपर्क साधण्याचे काम चालू आहे. याप्रकरणी खेड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पुढील तपास सुरू आहे.







# सेप्ट युनिव्हर्सिटी कडून मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग अभ्यासक्रमासाठी अर्ज आमंत्रित

## अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सेप्ट युनिव्हर्सिटी च्या नियोजन विद्याशाखेमार्फत उपलब्ध असलेल्या 'मास्टर इन अर्बन प्लॅनिंग' (एमयुपी) या दोन वर्षांच्या, पूर्ण-वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी अर्ज मागविण्यात आले आहेत. शहरीकरणाच्या वाढत्या गुंतागुंतीला सामोरे जाण्यासाठी या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून यामध्ये शहरी विकास, सार्वजनिक धोरण आणि नियोजनाच्या पद्धती यासाठी चिकित्सकपणे सहभागी होण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी होते. अर्ज स्वीकारण्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे.

ज्या व्यक्तींना शहरे कशी कार्य करतात हे समजून घेण्याची आणि अधिक समावेशक, शाश्वत व लवचिक शहरी भविष्य घडवण्याची तीव्र इच्छा आहे, त्यांच्या दृष्टीने एमयूपी आहे. वास्तविक शहरी आव्हानांमध्ये सहभागी व्हायचे आहे, सार्वजनिक धोरण आणि विकासाच्या निर्णयांवर प्रभाव टाकायचा आहे आणि विशेषतः भारतीय शहरांच्या संदर्भात सर्वांसाठी अधिक चांगली घडविण्यासाठी ज्यांना अर्थपूर्ण योगदान द्यायचे आहे, अशा व्यक्तींसाठी हा सुयोग्य ठरणारा आहे.


विद्यार्थ्यांना भू-स्थानिक (जिओ-स्पॅटिअल) विश्लेषण, संस्थात्मक आणि धोरणात्मक विश्लेषण, परिदृश्य निर्मिती, नियोजनाची तत्त्वे आणि पद्धती, तसेच प्रभावी व्यावसायिक संवाद कौशल्यांमध्ये भक्कम पाया प्रदान करण्याच्या उद्देशाने सुसज्ज करण्यासाठी मास्टर्स इन अर्बन प्लॅनिंग ((एमयुपी) कार्यक्रमाची रचना केली आहे. स्टुडिओ-आधारित शिक्षण हा या अभ्यासक्रमाचा गाभा आहे. त्याला संकल्पनात्मक, विश्लेषणात्मक आणि पद्धतशीर सखोलता निर्माण करणाऱ्या सैद्धांतिक अभ्यासक्रमांचा आधार लाभला आहे. तसेच आर्थिक साक्षरता, प्रशासकीय चौकट आणि दृकश्राव्य संवाद यांवरही समान भर देण्यात आला आहे. एमयूपी कार्यक्रमाचे पदवीधर सखोल संस्थात्मक जाणीव आणि व्यावसायिक क्षमता यांचा सामाजिक आणि पर्यावरणीय संवेदनशीलतेसह यांचा मेळ घालणारे नगर नियोजक (अर्बन प्लॅनर्स) म्हणून आपली कारकीर्द घडवतात. खाजगी आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील सल्लागार, सरकारी विभाग आणि संस्था, शहर नियोजन आणि शहरी विकास प्राधिकरणे, सार्वजनिक गृहनिर्माण संस्था, अनौपचारिक वस्त्यांसाठी काम करणाऱ्या गैर-सरकारी संस्था, खाजगी स्थावर मालमत्ता संस्था, संशोधन संस्था, शैक्षणिक संस्था आणि थिंक टँक्स यांसारख्या विविध पदांसाठी तरुण व्यावसायिकांची तयारी करून घेण्यावर या अभ्यासक्रमाचा भर आहे.

गेट परीक्षेत वैध गुण असलेले उमेदवार या कार्यक्रमाच्या आवश्यकतेनुसार अर्ज करू शकतात. ज्या अर्जदारांनी 'गेट २०२६' परीक्षा दिलेली नाही किंवा ज्यांच्याकडे पात्रतेसाठीचे गुण नाहीत, त्यांच्यासाठी सेप्ट युनिव्हर्सिटी ने एक पर्यायी मार्ग म्हणून सेप्ट पीजी टेस्ट उपलब्ध करून दिली आहे. ही परीक्षा ऑनलाइन घेण्यात येईल आणि दूरस्थपणे देता येईल. त्यामुळे सर्व भौगोलिक ठिकाणांमधील उमेदवारांना ती सहज उपलब्ध होईल.

## Amazon MX Player कडून ‘फटाफट’ लाँच; मायक्रो-ड्रामा आता मोफत

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोबाइल फर्स्ट प्रेक्षकांसाठी जलद आणि रंजक मनोरंजनाचा नवा पर्याय म्हणून Amazon MX Player ने ‘फटाफट’ या मायक्रो-ड्रामा प्लॅटफॉर्मची घोषणा केली आहे. या माध्यमातून भारतात प्रथमच प्रीमियम मायक्रो-ड्रामा सिरीज पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.




आजच्या धावपळीच्या जीवनशैलीत लहान, वेगवान आणि सहज पाहता येणाऱ्या कथांची वाढती मागणी लक्षात घेऊन ‘फटाफट’ विकसित करण्यात आला आहे. रोमान्स, ड्रामा, थ्रिलर आणि युवा-केंद्रित कथांसह विविध शैलींतील सिरीज यात उपलब्ध असून, प्रेक्षक कधीही आणि कुठेही बिंज-वॉच करू शकतात. सध्या बहुतेक मायक्रो-ड्रामा प्लॅटफॉर्म्स सशुल्क असताना Amazon MX Player ने हा फॉर्मॅट पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देत मोठा बदल घडवला आहे. त्यामुळे देशभरातील प्रेक्षकांना कोणत्याही शुल्काशिवाय दर्जेदार मनोरंजनाचा आनंद घेता येणार आहे. या लाँचसोबत मुनव्वर फारुकी यांच्या सहभागात एक नवीन ब्रँड कॅम्पेन सादर करण्यात आले आहे. या कॅम्पेनमधून छोट्या-छोट्या मनोरंजनासाठी पैसे खर्च करण्याची गरज नसल्याचा संदेश हलक्याफुलक्या शैलीत देण्यात आला आहे.Amazon MX Player चे प्रमुख करण बेदी म्हणाले, “प्रीमियम मनोरंजन सर्वांसाठी मोफत उपलब्ध करून देणे हे आमचे ध्येय आहे. ‘फटाफट’द्वारे आम्ही वेगाने वाढणाऱ्या मायक्रो-ड्रामा श्रेणीत प्रवेश करत आहोत.” तर कंटेंट प्रमुख अमोघ दुसाद यांनी सांगितले की, “मायक्रो-ड्रामा हा कथाकथनाचा नवा आणि रोमांचक प्रकार असून, ‘फटाफट’मुळे विविध शैलींतील आकर्षक कथा प्रेक्षकांपर्यंत सहज पोहोचतील.” आगामी काळात ‘फटाफट’चा कॅटलॉग अधिक विस्तारत जाणार असून, देशभरातील प्रेक्षकांसाठी मायक्रो-ड्रामांची समृद्ध लायब्ररी उपलब्ध होणार आहे. प्रेक्षक Amazon MX Player च्या मोबाइल ॲपवर ‘फटाफट’ मोफत पाहू शकतात.

## नोटबंदीपासून गॅस टंचाईपर्यंत... “विकास” की जनतेची परीक्षा?

**शाईचा प्रवास | प्रतिक गंगणे**




**देशाच्या प्रगतीचे खरे मोजमाप हे मोठ्या इमारतींमध्ये किंवा चमकदार योजनांमध्ये नसते, तर ते सामान्य माणसाच्या आयुष्यातील बदलात दिसते. जर आजही लोकांना स्वयंपाकाच्या गॅससाठी रस्त्यावर उतरावं लागत असेल, तर ही परिस्थिती चिंताजनकच म्हणावी लागेल. कारण विकासाची खरी ओळख ही नागरिकांच्या मूलभूत गरजा किती सहज पूर्ण होतात, यावर ठरते. आजचा सर्वात मोठा प्रश्न असा आहे. देश खरोखरच पुढे जात आहे का, की फक्त घोषणांमध्येच प्रगती दाखवली जाते आहे? या प्रश्नाचे उत्तर देण्याची वेळ आता आली आहे. कारण लोक आता केवळ ऐकून समाधानी राहणार नाहीत, त्यांना प्रत्यक्ष बदल हवा आहे.**

**(दै. आरंभ पर्व)**

देशाला प्रगतीच्या मार्गावर नेण्याच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. मेक इन इंडिया, स्मार्ट सिटीज, डिजिटल इंडिया. या सगळ्या संकल्पना ऐकायला जितक्या आकर्षक वाटतात, तितक्याच त्या जमिनीवर कितपत उतरल्या आहेत, हा खरा प्रश्न आज सर्वसामान्य नागरिक विचारू लागला आहे. कारण वास्तव वेगळंच सांगतंय. काल नोटबंदीच्या काळात बँकांसमोर रांगा होत्या, आणि आज गॅस सिलेंडरसाठी लोकांना रस्त्यावर उतरावं लागत आहे.

२०१६ मधील नोटबंदीचा निर्णय अजूनही लोकांच्या स्मरणात ताजा आहे. स्वतःचे पैसे काढण्यासाठी लोकांनी तासन्तास रांगेत उभं राहून हाल सोसले. त्यावेळी सांगितलं गेलं की हा निर्णय देशहितासाठी आहे. पण त्यातून नेमकं काय साध्य झालं, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे. आणि आता पुन्हा एकदा परिस्थिती तशीच दिसू लागली आहे. फरक इतकाच, की यावेळी लोक पैशासाठी नाही, तर स्वयंपाकाच्या गॅससाठी त्रस्त आहेत.

स्मार्ट सिटींच्या गगनचुंबी स्वप्नांच्या पार्श्वभूमीवर गॅस टंचाईसारखी समस्या अधिकच ठळकपणे समोर येते. एका बाजूला आधुनिक शहरांची भाषा केली जाते, तर दुसऱ्या बाजूला नागरिकांना मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. हा विरोधाभासच आजच्या व्यवस्थेचे अपयश दाखवतो. कारण खऱ्या अर्थाने विकास तोच, जो सामान्य माणसाचे आयुष्य सुलभ करतो. नुसते प्रकल्प उभारून नाही, तर रोजच्या गरजा पूर्ण करून. गॅस टंचाई ही केवळ एक अपघाती अडचण नाही, तर ती नियोजनाच्या त्रुटींचे प्रतीक आहे. पुरवठा साखळीतील अडथळे, मागणी-पुरवठ्याचे अचूक अंदाज न लावणे आणि वेळेवर उपाययोजना न करणे. या सगळ्यांचा फटका थेट नागरिकांना बसतो. प्रश्न असा आहे की, अशा मूलभूत सेवांमध्येही जर व्यवस्था अपयशी ठरत असेल, तर मोठ्या घोषणांवर विश्वास ठेवायचा कसा?

सरकारकडून सतत नवीन योजना, नवीन प्रकल्प आणि नवीन घोषणा केल्या जातात. पण घोषणांचा हा पाऊस आणि सुविधांचा दुष्काळ यामधील दरी दिवसेंदिवस वाढताना दिसते. लाखो-कोट्यवधींचे प्रकल्प जाहीर होतात, पण सामान्य माणूस अजूनही गॅससाठी रांगेत उभा असतो. हीच आजच्या व्यवस्थेची सर्वात मोठी विसंगती आहे. सामान्य नागरिक बराच काळ सहनशील राहतो, कारण त्याला आशा असते की परिस्थिती सुधारेल. पण जेव्हा एकामागोमाग एक अशा समस्या समोर येतात, तेव्हा त्याचा संयम ढळू लागतो. आज लोक स्पष्टपणे सांगत आहेत. आम्हाला केवळ आश्वासन नकोत, तर प्रत्यक्ष सुविधा हव्यात. मोठमोठ्या घोषणांपेक्षा दैनंदिन जीवन सुलभ करणाऱ्या उपाययोजना अधिक महत्त्वाच्या आहेत.

## पुण्यात ‘शक्ती स्थापना दिवस’ व पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणासाठी कार्य करणाऱ्या शारदा शक्ती, पश्चिम महाराष्ट्र संस्थेतर्फे एरंडवणे येथील सेवाभवनमध्ये ‘शक्ती स्थापना दिवस’ आणि पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आयुष मंत्रालय मान्यताप्राप्त वैज्ञानिक डॉ. शर्मिला मांडे तर प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री कृषी संशोधक श्रीरंग (दादा) लाड उपस्थित होते. यावेळी वैद्य लीना बावडेकर, डॉ. प्रियंवदा हेर्लेकर आणि मनिषा कुलकर्णी यांची उपस्थिती लाभली. संयुक्त राष्ट्रांनी चालू वर्ष ‘महिला शेतकरी वर्ष’ म्हणून घोषित केल्याच्या पार्श्वभूमीवर निघोज (ता. पारनेर) येथील तरुण उद्योजिका श्रद्धा ढोरमले यांना ‘शक्ती प्रेरणा सन्मान’ पुरस्काराने गौरविण्यात आले. दुग्ध व्यवसाय, बायोगॅस व खत निर्मिती क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत त्यांनी सुमारे ४० जणांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे. तसेच बुलढाणा मेडिकल कॉलेजमध्ये एमबीबीएससाठी प्रवेश मिळवलेल्या अर्पिता बोराटे हिला ‘स्व शक्ती सन्मान’ देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमात शारदा शक्तीच्या विविध उपक्रमांची माहिती देताना विज्ञान, आरोग्य, पर्यावरण आणि उद्योजकता या क्षेत्रांत महिलांना सक्षम करण्यासाठी विविध योजना राबविल्या जात असल्याचे सांगण्यात आले. पद्मश्री दादा लाड यांनी कृषी क्षेत्रातील त्यांच्या ‘कॅनोपी मॅनेजमेंट’ तंत्रज्ञानाची माहिती देत महिला शेतकऱ्यांनीही त्याचा लाभ घेत असल्याचे सांगितले. तर डॉ. शर्मिला मांडे यांनी मायक्रोबायोम संशोधनाविषयी मार्गदर्शन करत आधुनिक वैद्यक आणि आयुर्वेदात त्याचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. मनीषा खळदकर यांनी केले. विविध संस्था, महाविद्यालयांचे पदाधिकारी आणि शारदा शक्तीच्या कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत हा सोहळा यशस्वीरीत्या पार पडला.

## शिअरफोर्स स्पर्धेत बीएनसीएचा तिहेरी जलवा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**



व्हीआयटीच्या पद्मभूषण वसंतदादा पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (पीव्हीपीसीओए) यांच्या वतीने १६, १७ व १८ मार्चदरम्यान आयोजित ‘शिअरफोर्स आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा २०२६’मध्ये भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (बीएनसीए) संघाने दमदार कामगिरी करत बास्केटबॉल, व्हॉलीबॉल आणि फुटबॉल या तिन्ही स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. बास्केटबॉल स्पर्धेत बीएनसीएने दणदणीत विजय मिळवत २१ हजार रुपयांचे पारितोषिक जिंकले. सई देशपांडे हिला ‘टॉप स्कोअरर’ तर रिया देशमुख हिला ‘बेस्ट प्लेअर’ म्हणून गौरविण्यात आले. व्हॉलीबॉल स्पर्धेतही बीएनसीएने वर्चस्व राखत प्रथम क्रमांक पटकावला असून संघाला २१ हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. फुटबॉल स्पर्धेत बीएनसीए संघाने उत्कृष्ट खेळ करत विजेतेपद पटकावले. या स्पर्धेत संघाला १२ हजार रुपयांचे पारितोषिक मिळाले. विशाखा शितोळे हिला ‘टॉप स्कोअरर’ म्हणून सन्मानित करण्यात आले.

## ‘ऐ अजनबी’सह कोक स्टुडिओ भारत सीझन ४ ची दमदार सुरुवात

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय संगीताच्या वैविध्यपूर्ण परंपरेला उजाळा देणाऱ्या कोक स्टुडिओ भारतने ‘ऐ अजनबी’ या गाण्यासह आपल्या सीझन ४ ची सुरुवात केली आहे. आदित्य रिखारी, कुतले खान आणि रॅवॅटर यांच्या सहयोगातून साकारलेले हे गाणे ‘ओढ’ या कालातीत भावनेवर आधारित आहे. हे गाणे प्रेमातील ओढ, अपूर्णता आणि व्यक्त न होणाऱ्या भावनांचा प्रवास मांडते. पत्रांमधील प्रेमापासून ते आधुनिक डिजिटल मेसेजपर्यंतच्या काळाचा सेतू बांधत, ‘ऐ अजनबी’ भूतकाळ आणि वर्तमान यांना एकत्र आणते. संगीताच्या दृष्टीने या गाण्यात लोकसंगीत आणि समकालीन पॉपचा सुरेख मिलाफ पाहायला मिळतो. आदित्य रिखारी यांचा भावपूर्ण आवाज, कुतले खान यांची पारंपरिक शैली




आणि रॅवॅटर यांची आधुनिक संगीत निर्मिती यामुळे हे गाणे वेगळेपणाने उठून दिसते. कोका-कोला इंडिया व साऊथवेस्ट एशियाचे आयएमएक्स प्रमुख शंतनू गंगाणे म्हणाले, “आजचे श्रोते विविध संगीतप्रकारांचा आनंद घेत आहेत. ‘ऐ अजनबी’द्वारे विविध पिढ्या आणि संस्कृतींना एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.” आदित्य रिखारी म्हणाले, “हे गाणे प्रत्येकाने अनुभवलेल्या ओढीच्या भावनेला स्पर्श करते. त्या भावनेला जशी आहे तशी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.”

# महाराष्ट्र-मॉरिशस स्नेहबंध अधिक दृढ

## मोका येथे ‘महाराष्ट्र भवन’ विस्ताराचा शिलान्यास

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून, सातासमुद्रापार राहूनही मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अभिमानाने जपली आहे, असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे केले.



मॉरिशसमधील मोका येथे ‘महाराष्ट्र भवन’ विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा त्यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने या प्रकल्पासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली. दोन दिवसीय दौऱ्यात चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी भारत-मॉरिशस संबंध, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सायबर सुरक्षा यांसारख्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. “मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे,” असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताच्या नेतृत्वाचे कौतुक केले. तसेच मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफुल, आयटी व इनोव्हेशन मंत्री डॉ. अविनाश रामतोहूल आणि कला व सांस्कृतिक मंत्री महेंद्र गोंदीया यांच्यासोबतही महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या. मॉरिशसला आफ्रिकेसाठी एआय क्षेत्राचे ‘प्रवेशद्वार’ बनविण्यासाठी भारताच्या सहकार्याची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. या दौऱ्याचा ठळक भाग म्हणजे मोका येथे उभारल्या जाणाऱ्या ‘महाराष्ट्र भवन’च्या विस्तारित वास्तूचा शिलान्यास. या प्रकल्पामुळे जागतिक स्तरावर मराठी अस्मितेला अधिक बळ मिळणार आहे. या वास्तूतील सभागृहाला ‘स्वातंत्र्यवीर सावरकर’ यांचे नाव देण्यास स्थानिक समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. दौऱ्यात सांस्कृतिक देवाण-घेवाण, ‘महा गणेशोत्सव २०२५’ निमित्त अनुदान वितरण, तसेच विविध मराठी संस्थांना आर्थिक मदत देण्यात आली. मेलरोझ, मॉंट रोचेस, डागोटियर, लेसपेरान्स आणि पाल्मा येथील मराठी संस्थांना अनुदानाचे धनादेश सुपूर्द करण्यात आले. या सर्व घडामोडींमुळे महाराष्ट्र आणि मॉरिशस यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ होत असून, मराठी संस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रसार होत असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.